IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 4, December 2023

# नवीन शैक्षणिक धोरण शिक्षणहक्क व कायद्याचे सक्षमीकरण

(Empowerment of Right to Education Act By New Education Policy)

डॉ अरूणा थुलदेवगडे
गोपिकाबाई शुरे महिला महाविद्यालय तुमसर
arunadeogade21@gmail.com

**प्रस्तावना:**

भविष्यातील समर्थ सक्षम आणिसत्मार्गी नागरिक घडवणे हे २०२० च्या शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्टय निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे येत्या दशकात शिक्षण व्यवस्थेची दिशा स्पष्ट होणार आहे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे देशात शिक्षण हक्क आधिनियम २००९ ची अंमलबजावणी एप्रिल २०१० पासून सुरु झाली त्यास एका दशकाचा कालावधी पूर्ण झाला आहे.

गत १० वर्षात देशाच्या प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत अनेक बदल घडुन आलेले आहेत. प्राथमिक शिक्षण क्षेत्रास बळकटी आणण्यासाठी अनेक मुलभूत व प्रशासानिक बदल करण्यात आलेले आहेत. अनेकदा शिक्षण हक्क कायद्याचा विस्तार व्हावा म्हणनही मागणी होत आहे.नवीन शैक्षणिक धोरण आगामी काळातील शासन व्यवस्थेकडन शिक्षण व्यवस्थेत अंगीकारल्या जाणाऱ्या बाबींचा आराखडा असतो. नकतेच दि२९ जलै २०२० रोजी भारत सरकारने नवीन शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. "नवीन शैक्षणिक धोरणातून भविष्याचा वेध घेणारे युवक तयार होतील" अशी अपेक्षा पंत्प्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबाबत व्यक्त केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणात पढील २५ वर्षाचा विचार करण्यासोबातच प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत आमलाग्र बदल स्वीकारण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. शिक्षण हक्क कायद्याचा विस्तारही करण्यात येणार आहे. शैक्षणिक प्रशासन भाषा व व्यवसाय शिक्षण शिक्षक प्राशिक्षण यामध्ये अनेक बदल सुचवण्यात आलेले आहेत.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 4, December 2023

म्हणून प्रस्तुत शोधनिबंधातून नवीन शैक्षाणिक धोरणाचा शिक्षण हक्क कायदा २००९ च्या अंमलबजावणीवर होणारा परिणाम तसेच त्यामुळे होणारे सक्षमीकरण अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्ट्य

I. नवीन शैक्षणिक धोरणातील महत्वपूर्ण बदल जाणून घेणे.

II. नवीन शैक्षणिक धोरणामळे शिक्षण हक्क कायद्याचे होणारे सक्षमीकरण याचा शोध घेणे.

Hypothesis

I. नवीन शैक्षणिक धोरणाने शिक्षण क्षेत्रात अनेक नवीन बदल प्रस्तावित केले आहेत.

II. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मळे शिक्षण हक्क कायदा २००९ ची प्रभावी अंमलबजावणी होऊन सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे

संशोधन पद्धती

या शोध लेखात आवश्यकतेनुसार ग्रंथालय संदर्भ साहित्य अनभवाच्या आधारे विश्लेषण या तंत्र व पद्धतींचा वापर करण्यात आला आहे.

HG:(Importance)

या शोध निबंधाच्या माध्यमातन नवीन शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे ज्ञात झाली नवीन शैक्षणिक धोरणाचा शिक्षण हक्क

कायद्याच्या अंमलबजावणीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करता आला. नवीन शैक्षणिक धोरण व शिक्षण हक्क कायदा यांचा परस्पर संबंध जाणून घेऊन शिक्षण हक्क कायद्याचे होणारे सक्षमीकरण जाणून घेण्यास मदत झाली.

**नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील महत्वपूर्ण तरतुदी**

**I. शिक्षण हक्क कायद्याचा विस्तार : शिक्षण हक्क अधिनियम २००९ मध्ये 6 ते १४ या वयोगटातील म्हणजेच इयत्ता 1 ते 8 पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण बंधनकारक करण्यात आले आहे. नवीन शैक्षणिक धोरणात या कायद्याचा विस्तार करून पूर्वप्राथमिक ते पदवीपर्यंत म्हणजेच 3 ते १८ वयोगटातील मुलांचा समावेश शिक्षण हक्क कायद्यात करून कायद्याचा विस्तार करण्यात आला आहे.**

**II. मातृभाषेतील शिक्षणास प्राधान्य: नवीन शैक्षाणिक धोरणात सध्या अस्तित्वात असलेल्या त्रिभाषा सूत्रात बदल केला नसला तरीही बालकांना इयत्ता 5 वी ते 8 वी पर्यंत मातभाषेतूनच शिक्षण मिळाले पाहिजे यावर भर देण्यात आला आहे. याबरोबरच माध्यमिक स्तरावर परदेशी भाषा शिकण्याची संधी मलांना उपलब्ध असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.**

**III. मूल्यमापन पद्धतीत सुधारणा: विद्यार्थ्यांच्या वर्ग 3 ५ 8 या स्तरावर परीक्षा घेण्यात येतील.तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालयांतर्गत PARAKH या मूल्यमापन संस्थेची स्थापना करण्यात येणार असून त्याद्वारे मूल्यमापन व विविध परीक्षांचे संचालन करण्यात येणार आहे. तसेच NTA- National Testing Agency ला परीक्षा घेण्याबाबत आधिकार प्रदान केले जातील**

**IV. शिक्षकांची नेमणक व प्राशिक्षण: नवीन शैक्षणिक धोरणात व्यावसायिक पात्रताधारक शिक्षकांचीच नेमणक करण्याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असून नियुक्तीनंतर नियमितपणे शिक्षकांचा व्यावसायिक विकास होण्यासाठी निरंतर प्रशिक्षण सविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याशिवाय शिक्षकांना त्यांच्या उच्च गणवत्तेनसार शैक्षणिक प्रशासनात उच्च पदावर संधी देण्यात येणार आहे. कला शा.शिक्षण व्यावसायिक शिक्षण भाषा विषयाच्या शिक्षकांची प्रधान्यांने नियक्ती केली जाणार असून शिक्षकांच्या बदल्या कमी किंवा अपवादात्मक स्थितीत करण्यात येतील. तसेच शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी करण्यात येतील**

**V. विद्यार्थीकेंद्रित व सर्वसमावेशक शिक्षण : शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाबरोबरच आंतर विद्याशाखीय दष्टीकोन स्वीकारला असून विध्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे विविध शाखेतील विषय निवडीचे स्वातंत्य मिळणार आहे तसेच शिक्षणाचे स्वरूप सर्वसमावेशक राहणार आहे.**

**VI. शिक्षणावरील खर्च 6% पर्यंत नेणे : कोठारी आयोगाने सुचवलेले व अद्यापही पूर्णत्वास न गेलेले शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण राष्ट्रीय उत्पनाच्या ६% पर्यंत नेण्याचे उद्दिष्टय प्रस्तत धोरणात ठेवण्यात आलेले आहे. जेणेकरून विविध शैक्षणिक गरजा पूर्ण केल्या जातील.**

**VII. शाळा संकल संकल्पना : १९९५ सालापासन अस्तित्वात आलेल्या केंद्रीय शाळा किंवा संकल शाळांना प्राधान्य देऊन त्या संसाधनाच्या दष्टीने अधिक सक्षम करण्यात येतील.जेणेकरून संकलातील संसाधनांचा कार्यक्षम सामहिक वापर (Sharina) ईतर अंतर्गत शाळांना करता येईल.**

**VIII. सर्वांगीण विकासाचे ध्येय : शिक्षणातून विद्यारथ्यांचा बौद्धिक भावात्मक व क्रियात्मक विकास म्हणजेच सर्वांगीण विकास करण्याचे ध्येय ठेवण्यात आलेले असून त्यादृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.संसाधने उपलब्ध करून देण्यात येतील.**

**शिक्षणातील गळती कमी करून उच्च शिक्षणात होत असलेल्या गळतीचा टक्का कमी केला जाइल**

**XI. शिक्षण स्तरात बदल : सध्या प्रचलित असलेल्या १०+२+३ या स्तराऐवजी 5+३+३+४ हा नवीन शैक्षणिक स्तर स्वीकारण्यात आला आहे.त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेली पद्धत बदलण्यात आली आहे.**

**नवीन शैक्षणिक थोरणाचा शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीवर होणारा परिणाम (Impact of New Education Policy on Implementation of Right to Education Act 2009)**

**१ शिक्षण हक्क कायद्याचे सक्षमीकरण : २०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणात 3 ते १८ वयोगटातील मलांचा समावेश केल्यामळे शिक्षण हक्क कायद्याचा विस्तार होऊन त्याचे सक्षमीकरण**

होण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षण्कि गरजांची पूर्तता करण्यावर नवीन धोरणात भर देण्यात आला आहे. शाळांना समद्ध करण्यास प्राधान्य दिले जाणार आह.

२. पायाभूत शैक्षाणिक सुधारणा : शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षण क्षत्रात अपेक्षित पायाभूत सुविधांची निर्मिती व पुरवठा करण्यावर नवीन शैक्षाणिक धोरणात लक्ष केंद्रित करण्यात आले आह. विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या परिसरात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे ही शिक्षण हक्क कायदातील अपेक्षा या शैक्षणिक धोरणात आधिक जोरकसपणे मांडण्यात आली आहे. ३. शाळाबाह्य मुले शिक्षण प्रवाहात : गेल्या अनेक वर्षांपासून शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यात आपल्याला यश मिळाले नाही.बालकामगार पालकांचे स्थलांतर सविधांचा अभाव आर्थिक मागासलेपण अशा अनेक कारणामुळे शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहणाऱ्या मुलांचे किमान प्राथामिक शिक्षण पूर्ण करण्यावर नवीन शैक्षाणिक धोरणात भर देण्यात आला आहे.

४. गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर : शिक्षणाचे केवळ सार्वत्रिकीकरण करणे महत्वाचे नाही तर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणे महत्वाचे आहे.म्हणून शहरी किंवा ग्रामीण असा भेदभाव न करता सर्वांना समान व उच्च प्रतीचे शिक्षण देण्याचे उद्दिष्टिय नवीन शैक्षणिक धोरणात ठेवण्यात आले आहेः त्यामुळे शिक्षण हक्क कायद्यातील गुंवातापूर्ण शिक्षणाचे ध्येय पूर्ण होणार आहे.

५. आर्थिकदृष्ट्या दर्बल घटकांना सवलत : शिक्षण हक्क कायदातील तरतुदीनुसार आर्थिकदृष्ट्या घटकांच्या पाल्यांसाठी खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेत २५%प्रवेश राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर नवीन शैक्षणिक धोरणात भर देण्यात आला आहे.

६. शिक्षण व्यवस्थेत लवचिकता : विद्यार्थयांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडीचे स्वातंत्य देण्यात आल्यामुळे लवचिकता आणण्यात आली असून किमान 5 व्या इयत्तेपर्यंत मातभाषेतून शिक्षण देण्याची तरतूद नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आली आहे. आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 4, December 2023

स्वीकारल्यामुळे तसेच व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात आल्यामळे विद्यार्थ्यांना सक्तीने विषय घेण्याची आवश्यकता असणार नाही

७. शाळा व्यवस्थापनात पालकांचा सहभाग : शाळा विकासात पालकांचा सहभाग अतिशय महत्वाचा असल्याने शाळा विकास आराखडा तयार करताना शाळेच्या गरजानसार व पालकांचा सहभाग घेऊन करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे पालकांची भमिका शाळा विकासात अधोरेखित करण्यात आली आहे.

८. विषय शिक्षकांची नियुक्ती : कोठारी आयोगाने कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण या विषयांना महत्वाचे स्थान देऊन त्यासाठी अध्यापनात तासिका निश्चित केल्या होत्या शिक्षण हक्क कायद्यात या विषयासाठी स्वतंत्र प्रशिक्षित अंशकालीन  शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत तरतूदी केल्या आहेत. नवीन शैक्षाणिक धोरणातही यावर भर देण्यात आला आहे.

९. पात्र शिक्षकांची नियृक्ती प्रशिक्षण व बदल्याबाबत स्पष्टता : शिक्षण हक्क कायद्यानसार शिक्षक पात्रता परीक्षा TET उतीर्ण शिक्षकांची नियृक्ती आनिवार्य केली आहेः त्यादष्टीने नवीन शैक्षणिक धोरणात अधिक स्पष्टता आणण्यात आलेली आहेःपात्र व गुणवत्ताधारक शिक्षकांची नियृक्ती करून त्यांना निरंतर व्यावसायिक विकासाची संधी देण्यात येणार आहे. शिक्षक बदल्याबाबत सर्वसमावेशक धोरण निश्चित करून अतिशय कमी किंवा अपवादात्मक परिस्थितीत बदल्या करण्यात येतील अश्या तरतदी करून शिक्षकांना कार्य करताना स्थैर्य मिळेल याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरवण्यात आले आहे.

अश्या रीतीने २०२० च्या नवीन राष्टीय शैक्षणिक धोरणात शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी व बळकटी आणण्यासाठी अनेक धोरणात्मक तरतदी करण्यात आल्या आहेत. १९६६ मध्ये कोठारी आयोगाने केलेल्या अनेक शिफारशीची पनरावत्तीही या शैक्षणिक धोरणात झाली आहे. एका अर्थाने एवढा कालावधी जाऊन सद्धा त्या पूर्ण न होणे आपल्या व्यवस्थेपढे प्रश्नचिन्ह उभे

करणारे आहे. अनेक धोरणे (Policv) आदर्श व गहितावर आधारित असतातः त्यांची प्रामाणिक अंमलबजावणी होणे अतिशय महत्वाचे आहे. अपेक्षा आहे नवीन शैक्षणिक धोरणातील अनेक तरतदी देशातील शिक्षणाचे व शिक्षण व्यवस्थेचे निश्चितच सक्षमीकरण करतील आणिआपला देश एक विकसित शक्ती म्हणून जगात उदयाला येईल. त्यादृष्टीने आवश्यक नागरिक व मनुष्यबळ घडवण्याची ताकद निषश्चितच नवीन शैक्षाणिक धोरणात आहे असा विश्वास वाटतो तो सार्थ ठरावा ही अपेक्षा

## निष्कर्ष Conclusion

सन १९६६ साली घोषित करण्यात आलेल्या राष्टीय शैक्षणिक धोरणातील अनेक शिफारशींची अद्यापही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.त्यामळे सन २०२० चे नवीन शैक्षणिक धोरणाची पर्तता होईल शंकाच आहे.

* शाळा व शैक्षणिक प्रशासन यांच्यात असणाऱ्या सविधांचा अभाव अंमलबजावणीतील मोठा अडथळा ठरू शकतो.
* विविध संकल्पना व तरतदींची अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद व यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे.
* नवनवीन तंत्रज्ञानावर आधारित बाबींचा समावेश करून संसाधनाचा कार्यक्षम वापर होणे आवश्यक आहे.
* शिक्षण हक्क कायद्यानुसार अपेक्षित किमान पातळीवरील गरजा पूर्ण होणे आवश्यक आहे.
* व्यावसायिक शिक्षण व कृत्रिम बुद्धिमित्तेला देण्यात येणाऱ्या प्राधान्यामुळे शिक्षण क्षावर दूरगामी परिणाम होऊ शकतो.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 4, December 2023

* विद्यारथ्यांच्या आवडीनसार विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळणार आहे.असे असले तरी शिक्षणातील गळती कमी करून वंचित समूहाच्या शिक्षणाकडे आधिक लक्ष पुरवणे आवश्यक आहे

* शिक्षण हक्क कायद्याच्या विस्तारामळे बालवाडी ते पदवीधर स्तरापर्यंत ३१८ वयोगटातील विद्यारथ्यांच्या शिक्षणास कायद्याचे आधष्ठान प्राप्त होऊन सक्षमीकरण होण्यास मदत होइल.

संदरभ सूची : References

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियक २००९ : भारताचे राजपत्र.

२) महाराष्ट शासन राजपत्र क्र. १ ४९ दि.११ ऑक्टोबर २०११.

३) महाराष्ट शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - विविध शासन निर्णय

४) राष्टीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षण मंत्रालय भारत सरकार

५) शिक्षण हक्काचा संकोच महाराष्ट टाइम्स.

६) विविध वर्तमानपत्रातील अग्रलेख

7) www.mscepune.in